**सुभाषित :**

काष्ठादग्निर्जायते मथ्यमानाद्भूमिस्तोयं खन्यमाना ददाति |
सोत्साहानां नास्त्यसाध्यं नराणां मार्गारब्धाः सर्वयत्नाः फलन्ति ||

**अर्थ :**

लाकडे एकामेकावर घासल्यामुळे अग्नि उत्पन्न होतो. (खरं म्हणजे हे फार कठीण काम आहे पण प्रयत्नपूर्वक सतत करत राहिल्यास यश मिळतं.) जमीन खणत राहिल्याने (खूप काळाने का होईना) पाणी लागतं. उत्साही लोकांना अशक्य असं काही नाही. (योग्य रीतीने) प्रयत्न केल्यावर ते सफल होतातच.